दैनिक
रुबाबदार राज्याचा, जबाबदार विचार...
# लक्ष महाराष्ट्र
www.lakshamaharashtra.com lakshamaha.dhule@gmail.com lakshamaha.nsk@gmail.com RNI No.MAHMAR/2019/79184
धुळे-नंदुरबार-नाशिक आवृत्ती ▶ वर्ष ५ वे ▶ अंक : ६९ वा ▶ शनिवार दि.१३ जानेवारी २०२४ ▶ किंमत :२ रु. ▶ पृष्ठे : ४

खुशखबर... खुशखबर...
खास लोकांच्या आग्रहास्तव
न्यू विजेयंत ट्रॅव्हल्स्, धुळे
पार्सल सेवा व रिटर्न बुकींग उपलब्ध
धुळे ते नागपुर, अमरावती, अकोला
स्लिपर कोच २X१ नॉन एसी बस
रात्री १०.३० वाजेला

संपर्क:- Mo.7035436897, (02562) 236897, 237896
दु.नं.१४, प्रबोधनकार ठाकरे संकुल,धुळे

## न्यूज कॉलम

### नॉयलॉन मांजाची धुळ्यात तपासणी

धुळे । मकर संक्रांतीच्या पार्श्वभुमीवर पोलिसांकडून शहरातील मांजा विक्रेत्यांची तपासणी करण्यात येत आहे. नायलॉन मांजाचा वापर व विक्रीवर बंदी आहे. त्यामुळे असा मांजा बाळगणाऱ्यांवर कारवाई करण्याचे आदेश जिल्हा पोलीस अधिक्षक श्रीकांत धिवरे यांनी दिले आहेत. मकर संक्रातीच्या निमित्ताने अनेक जण पतंग उडविण्यासाठी माजांचा वापर करतात, त्यामुळे पक्ष्यांसह लहान मुलांनच्या जीवाला धोका आहे. त्यामुळे शासनाकडून या मांजावर बंदी घालण्यात आली आहे. कारवाईचे आदेश असतानाही चोरी-छुपे पध्दतीने काही विक्रेते नॉयलॉन मांजाची विक्री करीत असल्याचे दिसून येते. यापूर्वीही मांजा विक्रेत्यांवर पोलिसांनी कारवाई केली आहे. यापुढेही विक्री प्रकार आढळल्यास काठोर कारवाई करणार असल्याचे पोलिस प्रशासनाने कळविले आहे.

### जिल्ह्यात शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश

धुळे । जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांनी मुंबई पोलिस अधिनियमअन्वये २५ जानेवारीपर्यंत शस्त्र व जमावबंदी आदेश जारी केला आहे. लग्नकार्य, मिरवणुका, आठवडे बाजार किंवा प्रेतयात्रेच्या जमावास लागू राहणार नाहीत. आदेश पोलीस अधिकारी, कामावर असलेल्या इतर शासकीय अधिकारी, कर्मचारी यांना सभा अगर मिरवणूका काढण्यास रितसर परवानगी घेतली असलेल्या व्यक्तींना लागू नाही, आदेशाचा भंग करणाऱ्या विरोधात कारवाई करण्यात येईल, असे आदेशात नमूद करण्यात आले आहे.

# युवकांच्या सामर्थ्यावर देशाची आर्थिक महासत्तेकडे वाटचाल : पंतप्रधान मोदी

### नाशिक येथे २७ व्या राष्ट्रीय युवा महोत्सवाचे शानदार उदघाटन

नाशिक । लक्ष महाराष्ट्र वृत्त



भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत काळातील आजची तरुण पिढी नशीबवान आहे, या पिढीला वेगवेगळ्या संधी उपलब्ध आहेत. या पिढीला सामर्थ्यवान आणि कौशल्याधारित करण्यासाठी सरकारच्या माध्यमातून विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. या युवकांच्या सामर्थ्यावरच भारताची जगातील आर्थिक महासत्ता होण्याकडे वाटचाल सुरू आहे. अमृत काळातील पुढील २५ वर्षांच्या कालावधीत परिश्रम घेत तरुणांनी २०४७ पर्यंत विकसित भारत घडवित इतिहास निर्माण करावा, असे आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज येथे केले.

केंद्रीय युवक कल्याण क्रीडा विभाग व राज्य शासनातर्फे नाशिक येथे आजपासून सुरू झालेल्या २७ व्या राष्ट्रीय युवा महोत्सवाचे उदघाटन पंतप्रधान मोदी यांच्या हस्ते आज दुपारी तपोवन मैदानावर झाले. त्यावेळी पंतप्रधान श्री. मोदी बोलत होते. यावेळी व्यासपीठावर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, केंद्रीय माहिती व प्रसारण, युवक कल्याण व क्रीडा मंत्री अनुराग ठाकूर, केंद्रीय क्रीडा राज्यमंत्री निसिथ प्रामाणिक, केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री डॉ. भारती पवार, राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ, नाशिक जिल्ह्याचे पालकमंत्री तथा सार्वजनिक बांधकाम मंत्री (सार्वजनिक उपक्रम) दादाजी भुसे, महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, ग्रामविकास व पर्यटन मंत्री गिरीश महाजन, क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे, विधानसभेचे उपाध्यक्ष नरहरी झिरवाळ, खासदार डॉ. सुभाष भामरे, खासदार हेमंत गोडसे, आमदार सर्वश्री चंद्रशेखर बावनकुळे, नरेंद्र दराडे, किशोर दराडे, माणिकराव कोकाटे, दिलीप बोरसे, दिलीपराव बनकर, प्रा. देवयानी फरांदे, सरोज अहिरे, डॉ. राहुल आहेर, सीमा हिरे, नितीन पवार, ड. राहुल ढिकले आदी उपस्थित होते.

#### मराठी भाषेतून राजमाता जिजाऊ यांना वंदन

**राजमाता जिजाऊ यांची आज जयंती. राष्ट्रीय युवा महोत्सवाच्या उद्घाटनानिमित्त पंतप्रधान श्री. मोदी यांच्यासह मान्यवरांच्या हस्ते राजमाता जिजाऊ यांच्या पुतळ्याचे पूजन करण्यात आले. हाच धागा पकडत पंतप्रधानी श्री. मोदी यांनी मराठीतून संवाद साधत अभिवादन केले. ते म्हणाले की, भारतीय नारी शक्तीचे प्रतीक राजमाता जिजाऊ यांच्या जयंतीनिमित्त वंदन करण्यासाठी महाराष्ट्राच्या वीरभूमीत येण्याची संधी युवा महोत्सवामुळे मिळाली याचा अतिशय आनंद होत आहे. राजमाता जिजाऊ यांना कोटी कोटी वंदन, असे सांगितले. एवढेच नव्हे, तर महाराष्ट्राची भूमी ही पुण्य, वीर तपोभूमी आहे. याच भूमीत राजमाता जिजाऊ यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या सारखा महानायक घडविला. याच भूमीत अहिल्याबाई होळकर, लोकमान्य टिळक, स्वातंत्र्यवीर सावरकर, अनंत कान्हेरे, रमाबाई आंबेडकर, चाफेकर बंधु, दादासाहेब पोतनीस यांच्या सारखी उत्तुंग व्यक्तिमत्वे घडली, असेही पंतप्रधान श्री. मोदी यांनी सांगितले.**

#### तीर्थक्षेत्रांची स्वच्छता करावी

**अयोध्या येथे २२ जानेवारी रोजी श्रीराम मंदिराचा प्राणप्रतिष्ठा सोहळा होत आहे. या सोहळ्यानिमित्त आबालवृध्दांनी या कालावधीत मंदिरांसह तीर्थक्षेत्रांच्या ठिकाणी स्वच्छता मोहीम राबवावी. याचाच एक भाग म्हणून आज सकाळी काळाराम मंदिरात दर्शनानंतर स्वच्छता करण्याची संधी मिळाल्याचे पंतप्रधान श्री. मोदी यांनी सांगितले.**

#### अद्वितीय कामगिरीची नोंद

**युवकांनी अद्वितीय कामगिरी बजवावी. या कामगिरीची समाज नेहमीच दखल घेतो. एवढेच नव्हे, तर इतिहासात या कामगिरीची सुवर्णाक्षकरांनी नोंद होते. स्त्री शिक्षणाच्या प्रणेत्या सावित्रीबाई फुले, शहीद भगतसिंग, चंद्रशेखर आझाद, बटुकेश्र्वर दत्त, हॉकीचे जादूगर मेजर ध्यानचंद ही त्याचीच उदाहरणे आहेत. तसेच देशातील प्रत्येक महिलेचा सन्मान करीत व्यसनांपासून तरुणांनी दूर राहावे, असेही आवाहन पंतप्रधान श्री. मोदी यांनी केले.**

प्रारंभी पंतप्रधान श्री. मोदी यांच्या हस्ते स्वामी विवेकानंद, राजमाता जिजाऊ यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. विविध राज्यांच्या संघांनी पथसंचलन केले. तसेच 'विकसित भारत २०४७- युवा के लिए- युवा का द्वारा' या संकल्पनेवर विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर करण्यात आले.पंतप्रधान श्री. मोदी म्हणाले की, स्वामी विवेकानंद, योगी अरविंद यांनी युवकांची ताकद ओळखली होती. ते युवकांचे प्रेरणास्थान आहेत. भारतीय युवकांचे परिश्रम, सामर्थ्यामुळे भारताची अर्थव्यवस्था जगात पाचव्या क्रमांकावर पोहोचली आहे. याच शक्तीच्या सामर्थ्यावर भारताची आर्थिक महासत्तेकडे वाटचाल सुरू आहे. याच युवकांच्या बळावर भारत मॅन्युफॅक्चरिंगचे हब तयार होत आहे. यातूनच तरुणांना इतिहास घडविण्याची संधी मिळणार आहे. स्वातंत्र्यापूर्वीच्या पिढीने देशासाठी जीवन अर्पण केले. आताच्या पिढीने पुढील २५ वर्षांचा काळ कर्तव्य काळ मानत विकसित भारताच्या निर्मितीसाठी द्यावा, त्यासाठी युवकांनी संकल्प सोडावा. जेणेकरून भारत जगात नव्या उंचीपर्यंत पोहोचू शकेल. त्यासाठी मेरा भारत- युवा भारत संघटन सुरू करण्यात आले आहे. त्यावर आतापर्यंत एक कोटी पेक्षा जास्त युवक- युवतींनी नोंदणी केली आहे. आधुनिक भारत घडविण्यासाठी तरुणांच्या मार्गात येणारे विविध अडथळे दूर करण्यात येत आहे. कौशल्य विकासावर आधारित राष्ट्रीय शिक्षण धोरण अंमलात येत आहे. त्यातून रोजगार निर्मितीला चालना मिळणार आहे. आयआयटी, एनआयटी महाविद्यालये सुरू करण्यात येत आहेत. युवकांमधील कौशल्य विकासासाठी पाश्र्चात्य देशांबरोबर सामंजस्य करार करण्यात आले असून त्यांचाही लाभ होत आहे. महामार्गांची निर्मिती, वंदे भारत रेल्वे, विमानतळांचाही विकास करण्यात येत आहे. चंद्रयान, आदित्य एल १ च्या यशाने जगाला भुरळ पडली आहे. गेल्या दहा वर्षांत केंद्र सरकारने युवकांना नवनवीन संधी दिली आहे. भारत लोकशाहीची जननी आहे. लोकशाहीच्या बळकटीकरणासाठी १८ वर्षांवरील तरुणांनी मतदार यादीत नाव नोंदणी करून मतदान करावे, असेही आवाहन पंतप्रधान श्री. मोदी यांनी केले. मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले की, प्रभू श्रीरामाच्या पदस्पर्शाने नाशिकची भूमी पावन झाली आहे. कुंभमेळा करिता नाशिक प्रसिद्ध आहे. अशा या भूमीत स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीच्या दिवशी राष्ट्रीय युवा महोत्सवानिमित्त देशभरातील युवक शक्ती एकत्र आली आहे. यानिमित्त येथे युवकांचा कुंभमेळाच भरला आहे. ही राज्यासाठी आनंदाची आणि अभिमानाची गोष्ट आहे. या क्रीडा महोत्सवाचे बोधचिन्ह राज्यातील भीमाशंकर, महाबळेश्र्वर आणि आंबा घाटाच्या जंगलात आढळून येणारा शेकरू हा अतिशय सुंदर प्राणी आहे. तो गतिशीलता, चपळता, विविधतेचे आकर्षण असणारा आणि पर्यावरणा प्रती सजग असलेला प्राणी आहे. त्यामुळे या बोधचिन्हातून तरुणांना मैत्री, सामजिक एकतेचा संदेश देतो. हा संदेश देशभरातील तरुण नाशिक मधील युवा महोत्सवातून आपापले राज्य, शहर आणि गावात घेऊन जातील, असा विश्वास मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी व्यक्त केला.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली नव्या भारताची जडणघडण होत आहे. त्यासाठी राष्ट्रीय युवा महोत्सव तरुणांसाठी प्रेरणास्रोत ठरेल, असे सांगत मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी महोत्सवासाठी आलेल्या तरुणांना शुभेच्छा दिल्या. युवकांच्या सक्रिय सहभागामुळे सन २०४७ पर्यंत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या स्वप्नातील विकसित भारत घडवतील, असा मला विश्र्वास आहे. पंतप्रधान मोदी यांच्या नेतृत्वाखालील भारताचे नाव जगात आदराने घेतले जात आहे. भारताची वाटचाल महासत्तेकडे सुरू आहे. त्यामुळे भारताचे भवितव्य उज्ज्वल आहे. स्टार्ट अप, स्टँड अप इंडिया यांसारख्या उपक्रमांमुळे भारताची आत्मनिर्भरतेकडे वाटचाल सुरू आहे.



# ऐतिहासिक काळाराम मंदिरातील भगवान श्रीरामाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी घेतले दर्शन

### घोषणांनी मंदिर परिसर दुमदुमला

नाशिक । लक्ष महाराष्ट्र वृत्त

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज येथील ऐतिहासिक श्री काळाराम मंदिरात जावून भगवान श्रीरामाचे मनोभावे दर्शन घेतले, त्यांच्या हस्ते काळाराम मंदिरात विधीवत पूजा व आरती करण्यात आली. यावेळी काळाराम मंदिर संस्थानचे मुख्य महंत व विश्वस्त यांच्यातर्फे पंतप्रधानमंत्री मोदी यांचा भगवान श्रीरामाची चांदीची प्रतिमा, शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.

काळाराम मंदिराचे मुख्य महंत आचार्य महामंडलेश्र्वर सुधीरदास महाराज, श्री काळाराम मंदिर संस्थानचे विश्र्वस्त धनंजय पुजारी, मंगेश पुजारी, नरेश पुजारी, मंदार जानोरकर, एकनाथ कुलकर्णी, पं. प्रणव पुजारी, अद्वय पुजारी तसेच वारकरी आणि संत परिवारातील मान्यवर उपस्थित होते.

याप्रसंगी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या समोर अभंग आणि भावार्थ रामायणातील आठव्या अध्यायाचे (श्लोकांचे) ज्यामध्ये प्रभू श्रीराम यांचा नाशिकमधील वास्तव्याचा उल्लेख आहे, त्याचे वाचन करण्यात आले. यावेळी मंदिर परिसरात उपस्थित महंत, वारकरी आणि संत कुटुंबातील वंशज यांच्याशी पंतप्रधानांनी संवाद साधला. मंदिर परिसरात असलेल्या स्वामी विवेकानंद यांच्या पुतळ्यास प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

# हिट ॲण्ड रन कायद्याविरोधात चालकांतर्फे निदर्शने

धुळे । केंद्र शासनाच्या हिट ॲण्ड रन कायद्याविरोधात आज द बस ड्रायव्हर ग्रुपतर्फे निदर्शने करीत शासनाचे लक्ष वेधण्यात आले. यासंदर्भात प्रशासनाला निवेदन देण्यात आले. निवेदनानुसार नवीन कायदा व त्या कायद्याला अनुसरुन दंडाबाबत योग्य तो निर्णय घ्यावा, अन्यथा अनेक संघटना रस्त्यावर उतरुन आंदोलन करतील, असा इशाराही यावेळी देण्यात आले. केंद्र शासनाने ३० डिसेंबर २०२३ ला भारतीय दंड विधान कलम २७९ (हिट ॲण्ड रन) बाबतचा घेतलेला निर्णय हा पुर्णत: एकतर्फी असुन तो ड्रायव्हर संघटनांवर अन्यायकारक आहे. या बदलाबाबत सरकारने कुठल्याही संघटना, अध्यक्ष किंवा पदाधिकाऱ्यांना विश्वासात न घेता एकतर्फी निर्णय घेतला आहे. वास्तविक कुठलाही ड्रायव्हर हा अपघात स्वत:हुन कधीच करत नसतो. अपघात होण्यास अनेक कारणे असु शकतात. परंतु त्यात फक्त ड्रायव्हरला दोषी ठरविणे हे पुर्णत: चुकीचे असुन या कायद्याबाबत घेतलेला एकतर्फी निर्णय आमच्या संघटनांना मान्य नाही. तरी ड्रायव्हरांचा सहानुभूतीपूर्वक विचार करून त्यांच्यावरील अन्याय दूर करावा, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

# आंतरराष्ट्रीय विद्रोही व्यंगकवी संपत सरल करणार विद्रोही साहित्य संमेलनाचे उद्घाटन

### अमळनेर येथे १८ वे साहित्य संमेलन

मुंबई । लक्ष महाराष्ट्र वृत्त



अमळनेर येथे येत्या ३ व ४ फेब्रुवारी २०२४ रोजी होणाऱ्या १८ व्या अखिल भारतीय विद्रोही साहित्य संमेलनाचे उद्घाटन जयपूर (राजस्थान) येथील सुप्रसिद्ध विद्रोही व्यंग कवी संपत सरल यांच्या हस्ते होणार आहे. यासंदर्भातील घोषणा विद्रोही सांस्कृतिक चळवळीच्या अध्यक्षा प्रा. प्रतिमा परदेशी यांनी मुंबई प्रेस क्लब येथे बैठकीत केली. यावेळी विद्रोही मराठी साहित्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष श्याम पाटील, मुख्य संयोजक डॉ. लिलाधर पाटील, निमंत्रक रणजित शिंदे, मुख्य समन्वयक प्रा.अशोक पवार , डी. ए. पाटील आदी उपस्थित होते.




यंदाचे १८ वे विद्रोही साहित्य संमेलन कवयित्री बहिणाबाई चौधरी साहित्य नगरीत जळगाव जिल्ह्यातील अमळनेर येथे मध्ये भरविले जाणार आहे. अमळनेरची भूमी ही खरा तो एकची धर्म, जगाला प्रेम अर्पावे असा खरा प्रेममय धर्म सांगत अन्यायाच्या विरोधात आता उठवू सारे रान, आता पेटवू सारे रानफ..असे अजरामर गीत लिहून मंदिर प्रवेशासाठी उपोषण आंदोलन करणाऱ्या साने गुरुजींची कर्मभूमी आहे. यंदाचे हे संमेलन आम्ही प्रेममय सत्य धर्म आणि समता, स्वतंत्र, बंधुत्व या मूल्य समर्थनार्थ या आशयसूत्रावर (थीम) आधारित घेत आहोत. धुळे रोडवरील आर. के. नगरच्या समोरील भव्य प्रांगणात हे संमेलन होणार असून दोन दिवस चालणाऱ्या या संमेलनात ३ परिसंवाद, २ कवी संमेलने, गटचर्चा, कथाकथन, युवा मंच, बालमंच, विचार दिंडी इ. असणारी आहे.

संपत सरल आज हे नाव जगभर लोकशाही मुल्यांवर निष्ठा असणारा विद्रोही कवी म्हणून प्रसिद्ध आहे. हास्य व व्यंगाच्या माध्यमातून अभिव्यक्त होणारा विद्रोही कवी म्हणून त्यांनी जगभर आपला ठसा उमटवला आहे. त्यांनी त्यांचे सुरुवातीचे शिक्षण त्यांच्या गावच्या शाळेतून घेतले, त्यानंतर त्यांनी जयपूर येथून उच्च शिक्षण घेतले आणि राजस्थान विद्यापीठातून बीएड केले आणि नंतर त्यांनी कवींमध्ये स्वत:ची एक वेगळी ओळख निर्माण केली. संपत सरल यांनी संपूर्ण भारतासह यूएसए, कॅनडा, ओमान, सिंगापूर, हाँगकाँग, यूएई, थायलंड, सौदी अरेबिया आणि नेपाळ आदी विविध देशात आपले काव्य आणि मुशायरा सादर केले आहेत. समकालीन राजकीय परिस्थितीवर परखड भाष्य करणारे विद्रोही व्यंगकवी म्हणून त्यांना ओळखले जाते. आपल्या सत्य आणि निर्भिड अभिव्यक्तीसाठी प्रसिद्ध आहेत. चाकी देख चुनाव की, आणि छद्मविभूषण हे त्यांचे काव्य संग्रह तर हम है ना, करम धरम, चक्कर पे चक्कर, बेटा बेटी के लि ए, ही टीव्ही वरील नाटके प्रसिद्ध आहेत. या संमेलनात वाचक, श्रोते, प्रेक्षक, रसिक,सामाजिक चळवळीतील कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे. असे आवाहन साहित्य संमेलनाचे निमंत्रक रणजित शिंदे , स्वागताध्यक्ष श्याम पाटील यांनी याप्रसंगी केले आहे.



पत्रकारांचा हक्काचा मंच...
|| सस्नेह निमंत्रण ||
धुळे जिल्हा मराठी पत्रकार संघ, धुळे
सर्वोत्कृष्ट पत्रकारांसह विविध क्षेत्रांतील रत्नांचा सन्मान
आणि नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा पदग्रहण समारंभ
रविवार, दि. १४ जानेवारी २०२४ रोजी सायं. ६.०० वाजता
* कार्यक्रमाचे अध्यक्ष *
मा. खासदार बाबासो. डॉ. सुभाषजी भामरे
(माजी केंद्रिय संरक्षण राज्यमंत्री, भारत सरकार)
* पुरस्कार शुभहस्ते प्रदान *
मा. श्री. दादाजी भुसे सो. (सार्वजनिक बांधकाममंत्री, महाराष्ट्र राज्य)
मा. श्री. भाईसो. अमरिशजी पटेल (आमदार/माजी मंत्री)
मा. श्री. बाबासो. कुणालजी पाटील (आमदार, धुळे ग्रामीण)
मा. श्री. भाऊसो. आ. जयकुमारजी रावल (माजी मंत्री)
* प्रमुख अतिथी *
मा.श्री.भैय्यासो. चंद्रकांतजी रघुवंशी (माजी आमदार) मा.ताईसो. मंजुळा गावित (आमदार, साक्री)
मा. श्री. श्रीकांतजी धिवरे (पोलिस अधीक्षक, धुळे) मा. श्री. फारुखजी शाह (आमदार, धुळे शहर )
मा. श्री. काशिरामजी पावरा (आमदार, शिरपूर) मा. श्री. अविष्कारजी भुसे (युवानेते)
* पुरस्कारार्थी *
मा. श्री. हेमराजजी बागूल
संचालक (प्रशासन), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई
मा. श्री. नरेंद्र (बंडूनाना) कुलकर्णी (ओएसडी, ना. अब्दुलजी सत्तार सो. (खान्देशरत्न)
मा. श्री. विवेकजी भावसार (ज्येष्ठ पत्रकार/संस्थापक, 'द न्यूज २१')
मा. श्री. अनिलजी चव्हाण (संस्थापक संचालक, झेप मराठी न्यूज)
मा. श्री. चेतनजी मंडोरे (युवा उद्योजक, धुळे (उद्योगरत्न)
मा. श्री. राजेंद्रजी इंगळे (सामाजिक कार्यकर्ते, धुळे (समाजरत्न)
* विशेष सन्मानार्थी *
मा. श्री. अनुपभैय्या अग्रवाल मा. श्री. इर्शादभाई जहागीरदार
मा. श्री. ॲड. मधुकरजी भिसे मा. श्री. विजयजी टाटीया
मा. श्री. डॉ. सुशीलजी महाजन मा. श्री. संदीपतात्या महाले
मा. श्री. हिलाल अण्णा माळी
* पदग्रहणार्थी पदाधिकारी *
मनोज गर्दे (अध्यक्ष) अतुल पाटील (शहर उपाध्यक्ष) अरुण धोबी (ग्रामीण उपाध्यक्ष)
सचिन बागूल (सचिव) तुषार बाफना (कोशाध्यक्ष) प्रकाश शिरसाट (प्रांतिक प्रतिनिधी).
* सदस्य मंडळ *
रवींद्र नगराळे, मोहन मोरे, पुरुषोत्तम पाटील, मनोहर सोलंकी, राजेंद्र भावसार, राकेश गाळणकर, संतोष ताडे, रेखचंद जैन, दीपक शिंदे, आकाश सोनवणे, जमिल शाह,
* स्वीकृत सदस्य *
अशोक तोटे, पंकज पाटील, वाल्मीक पाटील, आवेश खान, प्रदीप राजपूत, अजिंक्य देवरे
आपले विनित
श्री. भालचंद्र पुंजू ठाकूर, श्री. देवीदास निंबा माळी, श्री. रवींद्र नामदेव इंगळे, श्री. मिलींद अवचित बैसाणे, श्री. चंद्रशेखर आत्माराम पाटील, श्री. ओमप्रकाश गुलाबचंद शर्मा, श्री.नुरखान नवाजखान पठाण श्री. सिध्दार्थ संतोष पारेराव, श्री.सुनील भगवान पाटील, श्री.विशाल ठाकूर,श्री.पुरुषोत्तम गरुड, श्री. गणेश भीमराव सावंत, श्री.सुभाष बारकू वाघ,
स्थळ : धुळे जिल्हा मराठी पत्रकार संघ, धुळे., आयकर भवनच्या मागे, साक्री रोड, धुळे.

## निकाल आणि संघर्ष..!

शिवसेनेच्या निकालाच्या निमित्ताने कायदा, नियम, पद्धती यांवर बराच खल झाला; पण काही मुद्दे अनुत्तरित असल्याचे उद्धव यांच्या बोलण्यावरून जाणवते. त्यामुळे सर्वोच्च न्यायालयात हा वाद रंगणार यात शंका नाही. महाराष्ट्रात 'खरी शिवसेना' कोणती? या प्रश्नाचे उत्तर विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी दिले आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील गट हाच 'खरा राजकीय पक्ष' असल्याचा निर्वाळा त्यांनी दिला. सुमारे दीड वर्षांपूर्वी शिवसेनेत फूट पडल्यापासून रेंगाळत असलेल्या वादावर त्यामुळे पडदा पडला आहे. या फुटीनंतर दोन्ही बाजूंनी परस्परांचे आमदार अपात्र ठरवण्यासाठी दाखल केलेले अर्जही त्यांनी फेटाळले आणि कोणीच अपात्र नसल्याचे सांगितले. त्यामुळे या सर्व ५४ जणांचे विधानसभा सदस्यत्व कायम राहिले आहे. म्हणजेच त्यांची 'आमदारकी' टिकली आहे. हा निकाल सत्तारूढ गटाचे बळ वाढवणारा आणि उद्धव ठाकरे गटाला धक्का देणारा आहे. फूट उघड झाल्यानंतर दोन्ही बाजूंनी पक्षादेश काढले गेले होते. ते वेगवेगळ्या व्यक्तींनी जारी केले होते. त्यामुळे या वादात पक्षाचे प्रतोद कोण आणि कोणाचा पक्षादेश वैध हेही प्रश्न आले होते. मात्र नार्वेकरांच्या निकालाने उद्धव ठाकरे गटाच्या शिवसेनेचे अस्तित्वच नाकारले गेल्याने त्यांच्या प्रतोदाने जारी केलेला पक्षादेशही अवैध ठरला. विधिमंडळात कोणत्या गटाचे किती सदस्य हा मुद्दा नार्वेकरांनी विचारात घेतल्याने शिंदे गटाचे बहुमत सिद्ध झाले व त्यामुळे त्यांचा गट 'खरा पक्ष' ठरला. आता हा वाद सर्वोच्च न्यायालयात जाणार हे नक्की झाले आहे.

सुमारे दीड वर्षांपूर्वी शिवसेनेतील ४० आमदार फुटले व त्यांनी भारतीय जनता पक्षाशी हात मिळवणी केली आणि सरकार स्थापन केले. शिवसेना, काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस यांचा समावेश असलेले महाविकास आघाडीचे सरकार त्यामुळे कोसळले आणि उद्धव यांचे मुख्यमंत्रिपदही गेले. तेव्हापासून खरी शिवसेना कोणाची हा वाद सुरु झाला. मध्यंतरी निवडणूक आयोगाने शिवसेनेचे 'धनुष्य बाण' हे चिन्ह शिंदे गटाला दिले. त्यानंतर हा वाद अधिकच पेटला. सर्वोच्च न्यायालयाने आमदारांच्या अपात्रतेचा निर्णय अध्यक्षांवर सोपवला होता. शिवसेनेची घटना, पक्षातील नेतृत्वाची रचना, विधिमंडळातील सदस्य संख्या यांच्या आधारे आपण निर्णय घेतल्याचे नार्वेकर म्हणाले. शिवसेनेचे संस्थापक बाळासाहेब ठाकरे यांच्या निधनानंतर पक्षाने २०१८मध्ये नवी घटना तयार केली; पण ती निवडणूक आयोगाकडे नोंदलेली नाही. त्यामुळे शिवसेनेची १९९९ मधील घटना नार्वेकरांनी विचारात घेतली, कारण ती निवडणूक आयोगाकडे नोंदलेली आहे. नव्या घटनेत उद्धव ठाकरे यांचे स्थान 'पक्ष प्रमुख' असे आहे. काही आमदारांनी पक्ष प्रमुखांचा आदेश जुमानला नाही म्हणून ते अपात्र ठरतात हा ठाकरे गटाचा दावा नार्वेकरांनी फेटाळला आहे. पक्ष प्रमुखाची इच्छा ही पक्षाची इच्छा मानता येत नाही, असा त्यांच्या निकालाचा ढोबळ अर्थ आहे. 'पक्ष श्रेष्ठ' म्हणजे कोण? पक्षाच्या अध्यक्षांचा आदेश जर एखाद्याने अमान्य केला, तर पक्ष त्याच्यावर निलंबनासारखी कारवाई करू शकेल का? असा प्रश्न यामुळे उपस्थित होतो. भाजपमध्ये तर 'वरिष्ठ' नेतृत्व हेच सर्वोच्च असते. तेथे एक अध्यक्ष आहेत व एक अघोषित सर्वेसर्वा आहेत. काँग्रेसमध्येही 'हाय कमांड'ला महत्त्व आहे. तृणमूल काँग्रेससह अन्य पक्षांमध्येही तशीच स्थिती आहे. पक्ष प्रमुख व पक्षाध्यक्ष यामध्ये कायद्याच्या दृष्टीने काही फरक आहे का? याचे स्पष्टीकरण विधिज्ञांनी दिले पाहिजे. कारण भारतात 'पक्षांतर्गत लोकशाही'विषयी बोलले बरेच जाते, प्रत्यक्षात तिच्या 'असण्याबद्दल' शंका आहे. सर्वोच्च न्यायालयाने कान उघाडणी केल्याने नार्वेकरांनी १० जानेवारी रोजी निकाल देण्याची अंतिम मुदत पाळली. राष्ट्रवादी काँग्रेसमधील फुटीबाबत त्यांना येत्या दि.३१ पर्यंत निकाल द्यायचा आहे. तेथेही असाच निकाल येऊ शकतो हे शरद पवार यांनी सूचित केले आहे. अजित पवार गट जिंकला तर सरकार अधिक बलशाली ठरेल; पण त्यांची आता राज्य सरकारला व भाजपला गरजही नाही. सर्वोच्च न्यायालयात हा वाद रेंगाळेल. तोपर्यंत लोकसभेची निवडणूक येईल. उद्धव ठाकरे व शरद पवार यांना आपले प्रभुत्व सिद्ध करण्यासाठी जनतेला सामोरे जावे लागेल. एका वादाचा निकाल लागला असला तरी राजकीय संघर्ष संपलेला नाही.

# मोदींच्या संकल्प यात्रेतून देशवासीयांशी सफल संवाद

**केंद्र सरकार असो वा राज्य सरकार. ते जनतेसाठी विविध योजना जाहीर करतात; परंतु या योजनांची तळागाळातील जनतेला अनेकदा माहिती नसते. त्यामुळे लालफितीतील योजनांचा कारभार हा सरकारी बाबूंचा कागदी खेळ राहतो. त्याचा लाभ सर्वसामान्य लाभार्थ्यांना मिळतो का? याचे कधी मूल्यमापन होत नाही. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून देशभर सुरू झालेल्या विकसित भारत संकल्प यात्रेतून जनतेमध्ये सरकारी योजनांबाबत जागरूकता पाहायला मिळत आहे. तसेच त्यांच्यापर्यंत लाभ पोहोचविण्याचा प्रयत्न होत आहे.**




विकसित भारत संकल्प यात्रा १५ नोव्हेंबर २०२३ रोजी सुरू झाली. तेव्हापासून पंतप्रधानांनी संपूर्ण देशभरातील विकसित भारत संकल्प यात्रेच्या लाभार्थ्यांशी वेळोवेळी संवाद साधला आहे. ३० नोव्हेंबर, ९ डिसेंबर, १६ डिसेंबर आणि २७ डिसेंबर अशा चार दिवशी पंतप्रधानांनी दूरदृश्यप्रणालीद्वारे हा संवाद साधला होता. तसेच गेल्या महिन्यातील वाराणसी भेटीच्या दरम्यान पंतप्रधानांनी १७ आणि १८ डिसेंबर या दिवशी विकसित भारत संकल्प यात्रेच्या लाभार्थ्यांशी प्रत्यक्ष संवाद साधून चर्चा केली. या यात्रेच्या माध्यमातून केंद्र सरकारने सुरू केलेल्या महत्त्वाच्या योजनांच्या लाभांची माहिती कालबद्ध पद्धतीने सर्व लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविली जात आहे. सुमारे ११ कोटी सहभागींचा टप्पा पार करून ५ जानेवारी २०२४ रोजी विकसित भारत संकल्प यात्रेने महत्त्वाचा टप्पा पार केला, ही कौतुकास्पद बाब आहे. ही यात्रा सुरू झाल्यापासून ५० दिवसांत कोट्यवधींचा आकडा ही आश्चर्यकारक संख्या विकसित भारताचे सामायिक स्वप्न साकार करण्यास मदत करणार आहे. तसेच या यात्रेच्या मोठ्या प्रभावामुळे आणि अतुलनीय क्षमतेमुळे लोकांना एकत्र आणण्याचा उद्देश सफल होत असल्याचे दिसून येत आहे.

कोणत्याही पात्र लाभार्थ्याला सरकारी योजनांच्या लाभापासून वंचित न ठेवण्याचे विकसित भारत संकल्प यात्रेचे मुख्य उद्दिष्ट आहे. यात्रेचा प्रारंभ झाल्यापासून, सुरक्षा वीमा योजना, जीवन ज्योती योजना, पीएम स्वनिधीसाठी लाखो अर्जांसह उज्ज्वला कनेक्शनसाठी १२ लाख नवीन अर्ज प्राप्त झाले आहेत. आतापर्यंत दोन कोटींपेक्षा जास्त लोकांची आरोग्य तपासणी करण्यात आली असून, त्यात एक कोटी लोकांची क्षयरोग तपासणी आणि २२ लाख लोकांच्या सिकल सेल तपासणीचा समावेश आहे. पंतप्रधानांनी नमूद केले की, आज गरीब, दलित, वंचित आणि आदिवासींच्या दारापर्यंत डॉक्टर पोहोचत आहेत जे पूर्वीच्या सरकारांनी आव्हान मानले होते. त्यांनी आयुष्मान योजनेवरही प्रकाश टाकला, जी पाच लाख रुपयांचा आरोग्य वीमा, गरिबांसाठी मोफत डायलिसिस आणि जनऔषधी केंद्रांवर कमी किमतीची औषधे उपलब्ध करून देते. देशभरात बांधलेली आयुष्मान आरोग्य मंदिरे ही गावे आणि गरिबांसाठी मोठी आरोग्य केंद्रे बनली आहेत.

मोदींच्या हमीची गाडी देशाच्या कानाकोपऱ्यांत पोहोचत आहे. सरकारी योजनांचा लाभ मिळण्याच्या प्रतीक्षेत आयुष्य वेचणाऱ्या गरीब लोकांमध्ये आज अर्थपूर्ण बदल होताना दिसत आहे. सरकार लाभार्थ्यांच्या दारापर्यंत येत असून, त्याचा सक्रियपणे लाभ मिळत आहे. विशेष म्हणजे जे सरकारी बाबू यांना भेटण्यासाठी जनतेला त्यांच्या कार्यालयात जावे लागत होते ते मोदींच्या हमीच्या गाडीसोबतच सरकारी कार्यालयातील अधिकारी, कर्मचारी लोकांपर्यंत पोहोचत आहेत. विकसित भारत संकल्प यात्रा हा केवळ सरकारचा प्रवास नसून देशाचा प्रवास बनला आहे, असे मत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केले आहे. यापूर्वीच्या सरकारांच्या कार्यकाळात, शेतकऱ्यांसमोर दररोज उभ्या राहणाऱ्या आव्हानांकडे दुर्लक्ष करून, कृषीविषयक धोरणांशी संबंधित चर्चांची व्याप्ती केवळ उत्पादन आणि विक्री एवढ्यापर्यंतच सीमित ठेवण्यात आली होती.

पंतप्रधान किसान सन्मान निधीच्या माध्यमातून प्रत्येक शेतकऱ्याला किमान ३० हजार रुपयांची मदत, पीएसीज, एफपीओ यांसारख्या संघटनांच्या माध्यमातून कृषी क्षेत्रात सहकाराला प्रोत्साहन, साठवण क्षमतेमध्ये वाढ तसेच अन्न प्रकिया उद्योगाला चालना यांसारख्या उपक्रमांचा उल्लेख पंतप्रधान मोदी यांनी या यात्रेदरम्यान केला आहे. आमच्या सरकारने, शेतकऱ्यांच्या सर्व समस्या सोडविण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले आहेत, असे मोदी यांचे म्हणणे आहे. 'मोदींची हमी' हा जागतिक चर्चेचा विषय बनला आहे. हमीची रूपरेषा आणि मिशन मोडमध्ये लाभार्थ्यांपर्यंत पोहोचवण्याच्या तर्कावर केंद्र सरकारकडून बारीक लक्ष असून, विकसित भारतचा संकल्प आणि योजनेचा तो दुवा आहे. पंतप्रधान मोदींनी गरीब, तरुण, महिला आणि शेतकऱ्यांच्या पिढ्यानपिढ्यांच्या संघर्षावर प्रकाश टाकला.

आधीच्या पिढीने जे जीवन जगले ते आताच्या आणि भावी पिढ्यांना जगावे लागू नये, अशी आमच्या सरकारची इच्छा आहे. देशाच्या मोठ्या लोकसंख्येला छोट्या-छोट्या दैनंदिन गरजांच्या संघर्षातून बाहेर काढायचे आहे, त्यामुळे आम्ही गरीब, शेतकरी, महिला आणि तरुणांच्या भविष्यावर लक्ष केंद्रित करीत आहोत. आमच्यासाठी या देशातील चार मोठ्या जाती आहेत. जेव्हा गरीब, शेतकरी, महिला आणि तरुण सक्षम होतील, तेव्हा देश सामर्थ्यवान होईल, असे लाभार्थ्यांशी संवाद साधताना पंतप्रधान मोदी यांनी भूमिका स्पष्ट केली आहे. त्यामुळे विकसित भारत संकल्प यात्रा ही केवळ सरकारचीच नाही, तर देशाची यात्रा बनली आहे. शेतकऱ्यांची प्रत्येक अडचण सोडविण्यासाठी मोदी सरकारकडून सर्वतोपरी प्रयत्न केले जात आहेत. गरीब, शेतकरी, महिला आणि तरुण सक्षम झाल्यावरच देश सामर्थ्यवान होण्यास मदत होणार आहे.

# शिंदे शिवसेनेंचा मोठ्ठा विजय..!


**शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारावर चाललेली शिवसेना ही एकनाथ शिंदे यांच्याच गटाची आहे, यावर विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्या ताज्या निकालाने शिक्कामोर्तब केले आहे. यापूर्वी केंद्रीय निवडणूक आयोगाने शिवसेना एकनाथ शिंदे गटाची आहे, असा निकाल दिला होता व शिवसेनेचे धनुष्यबाण हे अधिकृत निवडणूक चिन्ह शिंदे यांच्या गटालाच दिले होते. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार विधानसभा अध्यक्षांना शिवसेना कोणाची? या प्रश्नावर दोन्ही गटांची सुनावणी घेतली आणि कायदेशीर, घटनात्मक सर्व बाबींचा सखोल विचार करून शिवसेना एकनाथ शिंदे गटाचीच आहे, असा स्पष्ट निर्वाळा आपल्या निकालात दिला. या निकालामुळे उबाठा सेनेचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे पुन्हा एकदा तोंडघाशी पडले.**



महाराष्ट्रातील सत्ता संघर्षाच्या निकालाकडे सर्व देशाचे लक्ष लागले होते. शिवसेनेतील बंडानंतर शिवसेना कोणाची व बंडखोर आमदारांना अपात्र ठरविण्यावरून निर्माण झालेले वादळ यावर विधानसभा अध्यक्षांनी दिलेला निकाल ऐतिहासिक आहे. निकालापूर्वी अध्यक्षांवर उबाठा व विरोधी पक्षांकडून वाट्टेल तसे आरोप केले गेले. विधानसभा अध्यक्षांचे काय अधिकार व जबाबदाऱ्या असतात हे ठाऊक नसल्यावर काय बोलावे याचे भान काहींचे सुटले. त्यात आपण विधानसभा अध्यक्षांचा अवमान करीत आहोत हेही त्यांच्या लक्षात आले नसावे. एकनाथ शिंदे यांना व त्यांच्याबरोबर बंड केलेल्या १६ आमदारांना अपात्र ठरवावे यासाठी मातोश्रीचे कडबोळे देव पाण्यात घालून बसले होते. ज्यांनी शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांशीच प्रतारणा केली त्यांना केवळ स्वार्थ दिसत होता. मुख्यमंत्रीपदाच्या लोभासाठी त्यांनी सारी शिवसेना कशी काँग्रेसच्या चरणी अर्पण केली होती याचा साऱ्या महाराष्ट्राने अडीच वर्षे अनुभव घेतला. शेवटी सत्यमेव जयते केंद्रीय निवडणूक आयोगाने तसेच विधानसभा अध्यक्षांनी निःष्पक्षपाती निकाल दिला आणि खरी शिवसेना एकनाथ शिंदे यांचीच आहे, असे स्पष्ट केले. एकनाथ शिंदे यांच्याबरोबर असणाऱ्या १६ आमदारांना पात्र म्हणून जाहीर केले आणि भरत गोगावले यांची प्रतोदपदी केलेली नियुक्तीही वैध ठरविली. जे सचोटीने वागले, त्यांना या निकालाने न्याय मिळाला. ज्यांनी स्वार्थासाठी लबाड्या करून पक्ष चालविला व वडिलांच्या पुण्याईवर पक्षप्रमुख म्हणून मिरवले त्यांना या निकालाने धडा शिकवला.

गेल्या निवडणुकीत शिवसेनेचे ५५ आमदार निवडून आले, पैकी ३७ आमदार मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे आहेत, म्हणूनच त्यांच्या नेतृत्वाखालील गट ही खरी शिवसेना आहे, असे राहुल नार्वेकर यांनी आपल्या निकालात म्हटले आहे. विधानसभा अध्यक्षांचा निकाल हा उबाठाला किंवा काँग्रेसला आवडणार नाही. शिंदेंच्या मनासारखा निकाल झाला हे वास्तव आहे, पण शिंदे कुठेही खोटे वागले नाहीत. त्यांनी शिवसेना आणि शिवसेनाप्रमुखांचे विचार वाचविण्यासाठी पक्षात उठाव करण्याचे मोठे धाडस केले होते. दीड वर्षांपूर्वी एकनाथ शिंदे यांनी पक्षात उठाव करण्याची हिम्मत दाखवली नसती, तर आज शिवसेना कदाचित दिसलीही नसती. धनुष्यबाण कुठे हरवला असता. शिवसेनाप्रमुखांचे विचार कोणी मांडताना दिसले नसते. म्हणूनच विधानसभा अध्यक्षांचा निकाल म्हणजे सत्याचा विजय आहे. शिवसेना शिंदे यांचीच, असा निकाल जेव्हा जाहीर झाला तेव्हा केवळ मुंबई - ठाण्यातच नव्हे, तर राज्यात सर्वत्र शिवसैनिकांमध्ये जल्लोष झाला. भाजपालाही मोठा आनंद झाला. अनेक ठिकाणी सामान्य कार्यकर्त्यांनी मिठाई वाटून आणि भगवा फडकावून आनंद साजरा केला. खरी शिवसेना शिंदे यांची यावर शिक्कामोर्तब झाल्याने येत्या लोकसभा निवडणुकीत महायुतीला त्याचा मोठा लाभ होणार आहे, हे वेगळे सांगण्याची गरज नाही. शिंदे गटाचे १६ आमदार अपात्र ठरवावेत, असा घोशा उबाठा सेनेच्या नेत्यांनी लावला होता, पण त्यांना अपात्र ठरविण्यासाठी कोणतेही वैध कारण नाही, असे विधानसभा अध्यक्षांनी आपल्या निकालपत्रात म्हटले आहे. भरत गोगावले याची प्रतोद म्हणून झालेली नियुक्ती योग्यच आहे व त्यांचा व्हीप लागू होतो, असेही नमूद केले आहे. सुनील प्रभू यांची चीफ व्हीफ म्हणून नियुक्ती केली गेली तेव्हा पक्षात फूट पडल्याचे स्पष्ट झाले होते. सुनील प्रभू यांना विधिमंडळ पक्षाची बैठक बोलविण्याचा अधिकारच नव्हता, असेही शेरे निकालपत्रात आहेत. शिवसेनेच्या घटनेबाबतही अध्यक्षांनी आपल्या निकालपत्रात सविस्तर ऊहापोह केला आहे. जून २०२२ मध्ये शिवसेनेत दोन गट पडले व दुसऱ्याच दिवशी ते लक्षात आले, शिवसेनेची १९९९ ची घटना वैध असून नंतर सादर झालेली घटना ग्राह्य धरता येत नाही, असेही निकालात म्हटले आहे. २०१८ ची घटना मान्य करावी ही ठाकरे गटाची मागणी अध्यक्षांनी फेटाळून लावली आहे. ठाकरे गटाने केलेल्या घटना दुरुस्त्या कशा घटनाबाह्य आहेत, याचा त्यात उल्लेख आहे. पक्षप्रमुखांचे अधिकार व कार्यपद्धती यावरही निकालात ताशेरे मारले आहेत. पक्षप्रमुखांचे मत म्हणजे पक्षाचे मत याच्याशी आपण सहमत होऊ शकत नाही, तसेच पक्षप्रमुखाला त्याच्या मनात आले म्हणून कोणालाही पक्षातून थेट काढून टाकण्याचा अधिकार नाही, एकनाथ शिंदे यांनाही पक्षातून काढून टाकण्याचा अधिकार पक्षप्रमुखांना नाही, असे निकालात स्पष्ट म्हटले आहे. राष्ट्रीय कार्यकारिणीत चर्चा करून पक्षाचे निर्णय होत असतात, याकडे अध्यक्षांनी निकाल देताना लक्ष वेधले आहे. विधानसभा अध्यक्षांनी मुख्यमंत्र्यांकडे जाणे योग्य आहे का, या मुद्द्यावरून उबाठा सेनेने निकालाच्या आदल्या दिवशी अध्यक्षांवर हेत्वारोप करण्याचा प्रयत्न केला. पण कायदेशीर व घटनात्मक दोन्ही पातळीवर आपण दुबळे आहोत, निकाल आपल्या विरोधात जाणार याची खात्री पटल्यामुळेच निकालापूर्वी अध्यक्षांच्या व मुख्यमंत्र्यांच्या विरोधात उबाठा सेनेने थयथयाट करून वातावरण गढूळ करण्याचा प्रयत्न करून बघितला. पण जनतेची साथ व सहानुभूती ही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व महायुतीच्या सरकारलाच आहे, हे निकालानंतर झालेल्या जल्लोषातून दिसून आले.

## शब्दकोडे-२९१



**आडवे शब्द**

१. शाब्दिक हजामत ५. बोकड ७. वर्षा ऋतू १०. व्यवस्थित ११. खंदक १२. कल्याणकारी सल्ला १३. तालासुराचे एकत्र येणे १४. राघूची जोडीदार १५. समोरासमोरची चकमक १६. खानेसुमारी १८. कापड कापण्याचे साधन १९. जमीन, पृथ्वी २०. लोकनाट्यातील कलाकार २३. विशेष २५. खर्चाच्या विरुद्ध २७. बोबडी वळणे २९. न आवडणाऱ्या व्यक्तीतील चांगले गुणही वाईट भासतात (ला.) ३३. पृथ्वी ३५. शरीर ३६. मराठी भाषते या दोन अक्षरांपासून सुरू होणारा एकही शब्द नाही ३८. कालावधी ३९. नादी लागणे ४१. उद्याच्या नंतरचा दिवस ४३. मृत्यू नसलेला ४५. क्रिकेटमधील धाव ४६. शेवटचे दोन पांडव ४९. पुष्परस ५०. जनन ५१. ढीग ५३. पावाबरोबरचा खाद्यपदार्थ ५४. माराची उमटलेली खूण ५५. जयपराजय ५७. रात्री चमचमणारा कीटक ५८. सणांचा मराठी महिना ५९. केस कापणे ६१. सीतेचा एक पुत्र ६५. घाबरणे ६७. मोठी टोपली ६९. शर्करा ७१. बांबू ७३. हार, सर ७४. राष्ट्रगीताची सुरूवात ७६. ठाणवाई ७८. बाळाचा पाण्याचा शब्द ७९. रसाळ, तजेलदार ८२. एकरूप, रममाण ८३. कामदेव ८४. कसोटी

**उभे शब्द**

१. श्रीमंत, धनवान २. नारळाचे झाड ३. मांडणी ४. पोटाचा असल्यास चिंतेचे कारण! ५. पुष्कळ ६. सततचे नामस्मरण ७. बंधन ८. माल ९. सामन्यातील पराक्रमी खेळाडू १२. बर्फ १३. आंदोत्सवाचा दिवस १४. दोस्ती १६. अटीची भाषा १७. अदृश्य १८. कूर्म २१. आत्या २२. गाणे २३. भोजनालय २४. आघाडी, एकजूट २५. वतनदार २६. कच्चे मडके? २८. वाढलेला व्याप, अस्ताव्यस्त सामान ३०. नगाऱ्याचा आवाज ३१. चैतन्य, प्रोत्साहन ३२. थंड झाल्यावर पदार्थाचे आकसणे, आकुंचन पावणे ३४. नवरामुलगा ३७. लहान चणीचा ४०. सिंह ४१. दुर्दशा ४२. खास कोकणी द्विदल धान्य ४३. खालचा ओठ ४४. चित्रपट ४७. आरास ४८. सुबक अक्षर ४९. थोर, मोठा ५२. प्रश्न ५६. प्राण ६०. मवाळ धोरण ६२. वागणूक ६३. चप्पल ६४. दरी ६६. वेदनेची तिडीक ६८. श्रीरामाचे स्तोत्र कवच ७०. दर्यावर्दी ७१. शिखराचे टोक ७२. वाळवी ७४. अलीकडेच सुनामीच्या तडाख्यात सापडलेला देश ७५. धमनी ७७. चामखीळ ७८. पाय ८०. जाड दोर ८१. सरोवर, तडाग

### शब्दकोडे-२९० चे उत्तर

**आडवे उत्तर -**

१.हलवाई ३.कडबा
५.वाजतगाजत ९.कोस
११.लवाद १३.पाल १४.रसवान
१७.तमासगीर १९.सफर
२१.दार २२.रसातल २४.अज
२६.डहाळी २७.तेनसिंग
२८.दाम ३०.धोपटी ३२.हर हर महादेव ३५.गाज
३६.कवन ३७.तार ३८.दणका
३९.पाटी ४१.जीवन ४३.गेह
४५.मलमल ४८.वातड ४९.का
५१.मोकळाढाकळा ५३.वाटा
५४.सावकाश ५५.क्षमा
५६.समाधान ५७.आरसा
५८.लव ६०.कलप ६१.लगाम
६२.ढगळ ६४.चकित ६७.रमावर
६८.मानधन ७०.तारका ७२.नस
७४.मौन ७६.सदनिका ७८.मद
७९.रकमपात ८०.रडतराऊत

**उभे उत्तर-**

१.हजारदा २.वानवा ४.बालगीत
५.वाद ६.तपास ७.गालफड
८.तथ्य १०.सतत १२.वार
१५.सरतेशेवटी १६.नरसिंह
१८.मालदार २०.रहाटगाडगे
२३.सागर २४.अधोवदन २५.जप
२९.ममता ३१.टीकाकार ३३.हद्द
३४.हारजीत ३६.कपाळमोक्ष
४०.धमक ४२.वडवानल
४४.हताश ४५.लढाई ४७.लळा
४८.वारेमाप ५०.दिवसाढवळ्या
५२.कमालकिमान ५४.सार
५६.सलगता ५७.आमरस
५९.वतन ६३.गर ६५.भान
६६.मुकादम ६९.धडक ७१.रस
७२.नकार ७३.मदत ७४.मौज
७५.कृपा ७७.खंत ७८.मऊ

हे मराठी दैनिक मालक **विजय आत्माराम ठाकरे** यांनी मुद्रक-प्रकाशक-संपादक- चंद्रशेखर आत्माराम पाटील यांच्या पार्वती प्रिंटर्स-२, ई ११५/३, एम.आय.डी.सी., अवधान, धुळे (एम-५) येथे छापून, लक्ष महाराष्ट्र कार्यालय, बॉम्बे लॉज बिल्डींग, पहिला मजला, आग्रारोड धुळे येथून प्रकाशित केले.
**'लक्ष महाराष्ट्र' नाशिक कार्यालय** - फ्लॅट नं.१०, गंगा अपार्टमेंट, बोहरा पार्क, गंगापूर रोड, नाशिक-४२२००२ **मध्यवर्ती कार्यालय-** बॉम्बे लॉज बिल्डींग, दौलत म्युझिक सेंटरच्यावरती, पहिला मजला, आग्रारोड, धुळे. मो.९६६४३२५५५५ फोन नं. ०२५६२-३५६५७४.
**नंदुरबार कार्यालय** - शॉप नं. ११/१२, संत दगा महाराज कॉम्प्लेक्स, कोरीट नाका, नंदुरबार. **जळगाव कार्यालय** - बी विंग, रुम नं. ११ तिसरा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव. E-mail: lakshamaha.dhule@gmail.com. (RNI No.MAHMAR/2019/79184)

# सिकलसेलबाबत मुकेश पटेल चॅरिटेबलचे कार्य उल्लेखनीय : गोयल

**शिरपूर । लक्ष महाराष्ट्र वृत्त**



सिकलसेल अभियान बाबत शिरपूर येथील मुकेश पटेल चॅरिटेबल ट्रस्ट, अस्तित्वचे कार्य उत्कृष्ट व उल्लेखनीय असून यशस्वीपणे सुरु आहे. त्यांनी स्व-खर्चाने १० हजार किट देऊन सिकलसेल तपासणी पूर्ण केली, सिकलसेल ग्रस्त व वाहकांना योग्य काळजी घेण्याबाबत समुपदेशन कार्यशाळा घेतली, त्यांचे कार्य उल्लेखनीय असून मनापासून कौतुक करतो, असे गौरवोद्गार जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांनी काढले.

शिरपूर तालुक्यात आमदार काशिराम पावरा यांच्या उपस्थितीत गावोगावी विकसित भारत संकल्प यात्रा मार्फत विविध शासकीय योजना प्रत्यक्षात राबवून त्याची जनजागृती व आयुष्मान भारत कार्ड देखील देणे सुरु असल्याचे त्यांनी सांगितले. मुकेश पटेल चॅरिटेबल ट्रस्ट, अस्तित्व व सार्वजनिक आरोग्य विभाग, शिरपूर यांच्या संयुक्त विद्यमाने आर. सी. पटेल मेन बिल्डिंग, राजगोपाल भंडारी हॉलमध्ये आज मान्यवरांच्या हस्ते सिकलसेल कार्ड वाटप करण्यात आली, उपस्थित मुले, मुली व त्यांच्या पालकांना जनजागृतीपर समुपदेशन करण्यात आले. आमदार काशिराम पावरा, जिल्हा परिषद अध्यक्षा धरती देवरे, जिल्हा परीषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी शुभम गुप्ता, आर. सी. पटेल एज्युकेशनल ट्रस्ट अध्यक्ष भूपेशभाई पटेल, मुकेश पटेल चॅरिटेबल ट्रस्टचे संचालक द्वेता भूपेशभाई पटेल, शिरपूर एज्युकेशन सोसायटी उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, जिल्हा परिषद उपाध्यक्ष देवेंद्र पाटील, प्रांताधिकारी प्रमोद भामरे, तहसीलदार महेंद्र माळी, जिल्हा शल्य चिकीत्सक डॉ. दत्ता देवगावकर, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. बोडके, संस्थेचे सीईओ डॉ. उमेश शर्मा, संपादक सुभाष कुलकर्णी, सहाय्यक जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. प्रसन्न कुलकर्णी, सिकलसेल विभाग समन्वयक विलास वारुडे आदि मान्यवर उपस्थित होते.

द्वेता भूपेशभाई पटेल यांनी सांगीतले की, शिरपूर तालुक्यातील दुर्गम व आदिवासी भागात सिकलसेलसाठी काम सुरु केले. आतापर्यंत १० हजार सिकलसेल किट आम्ही व्यक्तिगतरित्या उपलब्ध केल्या. यात ४९४ बालके पॉझिटिव आले असून त्यातील काही सिकलसेल ग्रस्त व वाहक आहेत. त्यांना खासगी व शासनाच्या योजनांचा लाभ मिळवून देत आहोत. शिरपूर तालुक्यात गेल्या २ वर्षापासून सिकलसेल अभियान सुरु केले आहे. सर्वसामान्य नागरिकांच्या आरोग्याच्या इतरही अनेक समस्या सोडविण्यासाठी आम्ही पुढाकार घेतला आहे. समन्वयिका पौर्णिमा पाठक यांनी सुत्रसंचालन केले. मुकेश पटेल चॅरिटेबल ट्रस्ट, अस्तित्व ने केलेल्या कार्याची चित्रफित दाखविण्यात आली. विभाग समन्वयक विलास वारुडे यांनी सिकलसेल बाबत माहिती देऊन समुपदेशन केले. तालुका आरोग्य अधिकारी डॉ. राष्ट्रपाल अहिरे, स्वीय सहाय्यक सुनील जैन, स्वीय सहाय्यक योगेश्र्वर माळी, मुकेश पटेल चॅरिटेबल ट्रस्ट चे पदाधिकारी, शहर व तालुक्यातील सर्व प्राथमिक आरोग्य केंद्र अधिकारी, अनेक मान्यवर उपस्थित होते.

# नायलॉन मांजाची मनसे विद्यार्थी सेनेने केली होळी



**नाशिक । लक्ष महाराष्ट्र वृत्त**

महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेच्या वतीने नाशिक येथील मनसे राजगड कार्यालय येथे घातक अशा नायलॉन मांजाची होळी करण्यात आली. यावेळी नायलॉन मांजा विरोधातील मोहिमेला नागरिकांनी पोलिस प्रशासनाला साथ द्यावी असेही आवाहन करण्यात आले.

सध्या सर्वत्र मकर संक्रांतीची धामधूम असून लहान-मोठ्यांना पतंग उडविण्याचे वेध लागलेले आहेत. त्यामुळे सर्वजण पतंग आणि मांजा घेऊन त्याचा आनंद घेत आहेत. परंतु आपल्या परिसरात कोणीही नायलॉन मांजा वापरू नये यासाठी मनसे विद्यार्थी सेनेच्या वतीने नायलॉन मांजाची होळी करण्यात आली. नायलॉन मांजा हा खुपच घातक असून त्याचे खूप दुष्परिणाम होतात. रोज नायलॉन मांजामुळे पक्षी, प्राणी आणि माणसाला इजा होत आहे. सर्व नागरिकांना याचा त्रास होत आहे, तरी कोणीही घातक असा नायलॉन मांजा वापरू नये असे आवाहन करण्यात आले आहे.

सर्व पतंग व मांजा विक्रेत्यांनी नायलॉन मांजा विकू नये, कोणी विकत असल्यास त्याला विरोध करावा, नायलॉन मांजा हा पशू, पक्षी आणि माणसांना घातक असून त्यांने गंभीर इजा होऊ शकते. नायलॉन मांजा विद्युत तारांवर लागून शॉक लागू शकतो, पक्षांच्या पंखांत, प्राण्यांच्या पायात मांजा अडकला तर ते कायमस्वरूपी जखमी होऊन अधू होऊ शकतात, एखादा वाहनधारक मांजात अडकला तर त्याला दुखापत होऊ शकते, तरी अशा घातक मांजाला सर्वांनी विरोध करावा व मकरसंक्रांत सण लहान मुलांनी मोठ्या उत्साहात साजरी करावी, कोणीही नायलॉन मांजा वापरू नये, पतंग उडविताना साधाच मांजा वापरावा असे आवाहन महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेच्या वतीने करण्यात आले आहे.

यावेळी मनसे विद्यार्थी सेनेचे उपाध्यक्ष संदीप भवर, महाराष्ट्र प्रदेश कार्यकारिणी सदस्य शशिकांत चौधरी, बाजीराव मते, कौशल पाटील, जिल्हा उपाध्यक्ष नितीन धानापुणे, शहराध्यक्ष ललित वाघ, शहर संघटक अक्षय कोंबडे, विभाग अध्यक्ष मेघराज नवले, मनोज सावंत, अजिंक्य देवरे, गणेश शेजुळ, निखिल गोडसे, दर्शन बोरसे, शहर संघटक नितीन पंडित, मयूर पाटील, साई गुंजाळ, किरण पवार, योगेश पाटील आदी उपस्थित होते.

# समाजातील गरजूंसाठी धावणार आज हजारो नाशिककर

**नाशिक । लक्ष महाराष्ट्र वृत्त**

आज शनिवार दि. १३ जानेवारी रोजी समाजातील गरजूंसाठी हजारो नाशिककर धावणार असून महात्मानगर क्रीडांगणावर या उपक्रमाची तयारी पूर्ण झाली आहे. विशेषतः हा उपक्रम नियोजनबद्ध रीतीने पार पडावा म्हणून नाशिक रनचे चेअरमन रश्मी रंजन भुयान, रनचे उपाध्यक्ष अशोक पाटील, रनचे सचिव अनिल दैठणकर, खजिनदार राजाराम कासार, विश्वस्त रमेश शालींग्राम, मुकुंद भट, प्रबळ रे, अविनाश देशपांडे, श्रीकांत चव्हाण व रनचे पदाधिकारी विशेष लक्ष ठेऊन काम करीत आहेत.

२००३ साली नाशिक रन या समाजसेवी उपक्रमांची सुरुवात झाली. क्रीडा, सामाजिक, शैक्षणिक, आरोग्य विषयक व विविध उपक्रमांना आवश्यक त्या सुविधांसाठी नाशिक रन यांच्या माध्यमातून भरीव मदत केली जात आहे. करोना काळातील वर्ष वगळता २००३ ते २०२४ हा नाशिकचा समाजसेवेचा प्रवास अविरतपणे सुरू आहे. असे नाशिक रन चेअरमन रश्मीरंजन भुयांन यांनी म्हटले आहे. नाशिककरांच्या आवडीची आणि पसंतीची ही 'रन फॉर फन' शनिवार दि. १३ रोजी सकाळी साडेसात वाजता सुरू होईल. ज्याचा मार्ग मोठ्यांसाठी ४.५ किलोमीटर व लहानांसाठी २.५ किलोमीटर असा आहे. नाशिक रनच्या नोंदणी करीता लहानांसाठी प्रत्येक नोंदणी धारकास आकर्षक असा 'नाशिक रन २०२४' चा टी-शर्ट देण्यात येईल. या रन मध्ये भाग घेणाऱ्यास नाशिक रनचा टी-शर्ट परिधान करणे आवश्यक आहे. नाशिक रनच्या विश्वस्तांमार्फत सर्व नाशिककरांना या उपक्रमात मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन करण्यात



आले आहे. नाशिक रन साठी क्रीडांगण व्यवस्थापन, व्यासपीठ व्यवस्थापन, रन स्टार्टिंग पॉइंट व्यवस्थापन, वैद्यकीय सेवा व्यवस्थापन, पेयं जल व्यवस्थापन, वाहन तळ व्यवस्थापन आदींची निर्मिती करण्यात आली असून या विविध समित्यांतर्फे नाशिकला सुरळीत व्हावा यासाठी विशेष काळजी घेण्यात येणार आहे. नाशिक रन बद्दलच्या अधिक माहिती साठी ९७६५४ ९९२३६ या नंबर वर संपर्क करता येइल.

नितीन देशमुख, स्नेहा ओक या व्यवस्थापकीय पदाधिकारींसमवेत १५० हून अधिक स्वयंसेवक नाशिक रन साठी कार्यरत आहेत.



# पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केली गंगापूजनसह महाआरती

**नाशिक । लक्ष महाराष्ट्र वृत्त**

दक्षिणेची गंगा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या गोदावरी नदीची पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज गंगापूजन करून रामतीर्थ येथे दर्शन घेत विधीवत पूजा व आरती केली. भारत विश्र्वगुरू होऊ दे, असा संकल्प त्यांनी यावेळी केला. यावेळी गंगा पुरोहित संघाच्या वतीने अध्यक्ष व विश्र्वस्त यांच्याकडून पंतप्रधान मोदी यांना चांदीचा अमृत कलश, शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. पुरोहित संघ अध्यक्ष सतीश शंकर शुक्ल, दिलीप शुक्ल, चंद्रशेखर पंचाक्षरी, प्रतिक शुक्ल, वैभव दिक्षित, चंद्रशेखर गायधनी, शेखर शुक्ल, अतुल गायधनी, अमित पंचभैये, वैभव बेळे, भालचंद्र शौचे, उपेंद्र देव आदीसह पुरोहित संघाचे पदाधिकारी उपस्थित होते.

# होली मदर स्कुलमध्ये बक्षिस वितरण सोहळा उत्साहात




**नाशिक । लक्ष महाराष्ट्र वृत्त**

कॅनाल लिंक रोड येथील निर्मल कॉलनीमध्ये होली मदर इंग्लिश मीडियम स्कुलमध्ये वार्षिक क्रिडामहोत्सव बक्षिस वितरणाचा कार्यक्रम उत्साहात पार पडला. कार्यक्रमास प्रमुख पाहुण्या म्हणून माजी नगरसेविका हर्षदा गायकर उपस्थित होत्या.

याप्रसंगी विविध क्रिडा प्रकारात उल्लेखनीय कामगिरीसाठी विद्यार्थ्यांना पदक आणि प्रमाणपत्र देवून गौरविण्यात आले. याप्रसंगी पोलिस कर्मचारी मंगल बोरसे, शाळेच्या सचिव प्रतिभा भांगे, मुख्याध्यापिका किशोरी कापडणीस उपस्थित होत्या. शालेय स्तरावरच एखाद्या क्रिडाप्रकारात प्राविण्य मिळविता येत असून, भविष्यात राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर झळकण्याची संधी येथूनच मिळत असते. याशिवाय विद्यार्थ्यांना मिळालेले पारितोषिके हुरूप वाढविणारी असल्याने, विद्यार्थ्यांनी अभ्यासाबरोबरच खेळांमध्ये देखील प्राविण्य मिळवावे, अशी अपेक्षा यावेळी मान्यवरांकडून व्यक्त करण्यात आली. दरम्यान, संस्थाचालक हिरा प्रिटीकिन यांनी सर्व विजेत्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांना शुभेच्छा दिल्या.

ॲड. संदीप अर्जुन गर्दे
निशाणी क्र.-६

## जाहीर नोटीस

**धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधीश क स्तर सो. यांचे न्यायालयात**

दि.कि. अर्ज क्रं. ८२/२०२४

१. शोभा शिवाजी देवरे, वगैरे .....अर्जदार
वि
निरंक .........जाबदेणार
शिवाजी नथू देवरे (पाटील) .......मयत

ज्या अर्थी अर्जदारांनी धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर कोर्ट क्र. सो. धुळे यांचेकडे दि. ९/१/२०२४ रोजी अर्जदार यांनी कि. दि . अर्ज क्र. ८२/२०२४ चा अर्ज कै. शिवाजी नथु देवरे (पाटील), यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदार यांना मयतांचे शासकीय व निमशासकीय कामासाठी मे. न्यायालयातून अर्जदार हे मयताचे कायदेशीर वारस असल्याबाबत वारस दाखला मिळणेकामी सदरचा अर्ज दाखल केलेला आहे. त्याअर्थी मे. न्यायालयाने पुढील चौकशीचे कामकाज चालविणेकरीता पुढील चौ. दि. २०/०२/२०२४ हि निश्चित केली आहे. त्या अर्थी तमामजनतेस, हितचिंतक, वारस, वगैरे संबंधिताना कळविण्यात येते की, याबाबत काही वाद असल्यास धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधीश क. स्तर, कोर्टनं. ५ सो.,धुळे यांचे न्यायालयात उक्त निश्चित तारीखेस वा तत्पूर्वी उपस्थित राहून हरकत नोंदवावी, त्याअर्थी मे. कोर्टाने दिलेल्या व निश्चित तारखेपर्यंत कोणाचीही काहीही हरकत आली नाही तर सदर अर्जाचे कामकाज पूर्ण करण्यात येईल त्यानंतर येणाऱ्या तक्रारींची कोणतीही दखल घेतली जाणार नाही.

ठिकाण : धुळे
दि. ११/१/२०२४

शिक्का

कामगिरी कारकुन — दिवाणी न्यायाधीश क.स्तर,धुळे
अधिक्षक — दिवाणी न्यायाधीश क.स्तर,धुळे

ॲड. प्रमोद एम. चौधरी
निशाणी क्र.-६

## जाहीर नोटीस

**धुळे येथिल मे दिवाणी न्यायाधीश (व.स्तर) सो. यांचे कोर्टात**

दि.कि. अर्ज नं. ४८/२०२४

गणेश माणिक बडगुजर .....अर्जदार
वि
कोणीही नाही
(कै. कमलबाई गणेश बडगुजर -मयत) ...जाबदेणार

ज्याअर्थी अर्जदार यांनी धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधीश (व. स्तर) सो. यांचे न्यायालयात दि. ५/१/२०२४ रोजी दि. कि. अर्ज नं. ४/२०२४ चा अर्ज दाखल केलेला आहे. ज्याअर्थी अर्जदार यांनी कै. कमलबाई गणेश बडगुजर यांचा वारस दाखला मिळणेकरीता अर्ज केलेला आहे.

त्याअर्थी मे. न्यायालयाने पुढील चौकशीचे कामकाज चालविणेकरीता पुढील चौ. दि.१२/०२/२०२४ ही निश्चित केली आहे. त्याअर्थी तमाम जनतेस, हितचिंतक, वगैरे संबंधीतांना कळविण्यात येते की, याबाबत काही वाद असल्यास धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधीश सो. क. स्तर कोर्ट नं.५. यांचे न्यायालयात उक्त निश्चित केलेल्या तारखेपर्यंत कोणाचीही काहीही हरकत आली नाही तर सदर अर्जाचे कामकाज पुर्ण करण्यात येईल त्यानंतर येणाऱ्या तक्रारीची कोणतीही
दखल घेतली जाणार नाही.

ठिकाण - धुळे
दिनांक - ११/०१/२०२४ आदेशावरुन

शिक्का

कामगिरी कारकुन — मे. दिवाणी न्यायालय सो. कोर्ट नं.
अधिक्षक — मे. दिवाणी न्यायालय सो. कोर्ट नं.

## जाहिर नोटीस

या जाहिर नोटीसीद्वारे सुचित करण्यात येते की, माझे पक्षकार असलम युसूफ शेख, रा. ४२५, सुलतीनिया नगर, जामचा मळा, धुळे त्यांचे मालकीचे मौजे धुळे, ता. जि. धुळे येथील स.नं. ४३६/१ब/२/३ पैकी प्लॉट नं. ४२५ चे एकुण क्षेत्र १५० चौ.मी. यापैकी उत्तरेकडील भागाचे क्षेत्र ६० चौ. मी. या मिळकतीस अनुषगुन एच.डी.एफ.सी. बँक लि., शाखा देवपुर, धुळे यांचेकडे गृह कर्ज मंजूर करण्याचा प्रस्ताव सादर केलेला आहे. सदरचे मालमत्तेचे असमल युसुफ शेख यांच्या खरेदीपुर्वी झालेले मालकी हस्तांतरणा बाबतचे म. दुय्यम निबंधक, धुळे यांचेकडे नोंदविलेले खरेदीखत व त्याची मुळ एस. आर. पावती गहाळ/हरविले असल्याचे माझे पक्षकारांनी कळविले आहे. ते येणे प्रमाणे मा. दुय्यम निबंधक सो. धुळे यांचे कार्यालयात दिनांक ३०/०४/२०१२ रोजीचे दस्त कं. २९०९/२०१२ अन्वये नोंदणीकृत खरेदीखत व त्याची एस.आर. पावती.

सदरचे मुळ दस्त हे माझे पक्षकार घेत असलेल्या गृह कर्जा बाबत लिंक दस्ताऐवज असुन सदरचे दस्ताऐवज कोणासही मिळाली असल्यास त्याचा कोणीही गैरवापर करू नये तसेच सदरचे खरेदीखताची पावती कोणत्याही संस्थेकडे, बॅन्केकडे किंवा इतर कोणाहीकडे तारण गहाण/नजर गहाण असल्यास किंवा त्यावर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा बोझा अथवा हितसंबंध असल्यास किंवा कोणालाही मिळून आल्यास किंवा कोणाचाही उजर आक्षेप असल्यास पुराव्याचे मुळ कागद पत्रांसह खालील पत्त्यावर ही नोटीस प्रकाशित झाल्याचे तारखेपासुन ७ दिवसांचे आत प्रत्यक्ष येऊन भेट घ्यावी. तोंडी हरकत किंवा परस्पर वर्तमान पत्रात जाहीर हरकत नोटीस दिल्यास सदरचे हरकत/नोटीस आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. तसेच मुदतीनंतर कोणाची हरकत आल्यास ती आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही.

सही पक्षकार
असमल युसुफ शेख

सदरची नोटीस पक्षकाराने दिलेल्या कागदपत्र, माहितीवरून व सांगणेवरून आमचेमार्फत प्रसिध्दीस दिली असे.

धुळे :
दिनांक : १२/०९/२०२४

**ॲड. विजय म. मोरे**
नोटरी-भारत सरकार
ऑफिस - बी / १२.
भन्साली प्लॉझा, नगरपट्टी, धुळे

००००००
निशाणी क्र.-६

## जाहीर नोटीस

**धुळे येथिल मे. दिवाणी न्यायाधिश व. स्तर सो. यांचे कोर्टात**

कि. दिवाणी अर्ज नं. ६४/२४

नरेंद्र अर्जुनराव चौधरी, वगैरे .....अर्जदार
आणि
अर्जुन बाबुलाल चौधरी (मयत) .......जाबदेणार

ज्या अर्थी उपरोक्त अर्जदार यांनी मुंबई रेग्युलेशन ॲक्ट कलम २ व ३ प्रमाणे वारस दाखला (लिगल हेअरशिप सर्टिफिकेट) मिळणसाठी अर्ज दाखल केला असुन मयत अर्जुन बाबुलाल चौधरी यांचे अर्जदार वारस आहेत. विवीच शासकीय व निमशासकीय कामासाठी वारस दाखला मिळावा म्हणुन धुळे न्यायालयात वारस दाखला मिळणेकरीता अर्ज केला आहे.

ज्या अर्थी उपरोक्त अर्जदार यांचे नावे वारस दाखला मिळणेसंबधी कुणाचीही कुठल्याही प्रकारची हरकत असल्यास सदर इसमानें दि. १४/२/२०२४ रोजी मे. ५ वे सह दिवाणी न्यायाधिश (क. स्तर) यांचे कोर्टात स्वतः अगर वकीलांमार्फत हजर राहुन लेखी स्वरुपात हरकत सादर करावी. सदर तारखेस कुठलीही हरकत न आल्यास सदर अर्जाचे कामी योग्य तो आदेश पारीत करण्यात येईल याची नोंद घ्यावी

धुळे
दिनांक. ११-१-२४ आदेशावरुन

शिक्का

कामगिरी कारकुन — दिवाणी न्यायाधीश व.स्तर,धुळे
अधिक्षक — दिवाणी न्यायाधीश व.स्तर,धुळे

ॲड.सिध्दार्थ जी. बाविस्कर
निशाणी क्र.-६

## जाहीर नोटीस

**धुळे येथील मे. दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर सो. यांचे कोर्टात**

कि. दिवाणी अर्ज नं. ७२/२०२४

गंगुबाई उत्तम भामरे व इतर .....अर्जदार
विरुध्द
रजनी संजय भामरे, उ. वय ३५ वर्षे, धंदा :- घरकाम
रा. साईनगर, नांदुर गांव, माडसांगवी, नाशिक ...सा.वाला
१. उत्तम महारु भामरे, मृत्यु दि. २४/०८/२०२२ ...(मयत)
२. संजय उत्तम भामरे, मृत्यु दि. २४/०८/२०२४...(मयत)
३. वनाबाई महारु भामरे, मृत्यु दि. ...(मयत)

ज्याअर्थी अर्जदार याने धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधिश सो.क.स्तर यांचे न्यायालयात दि.८/१/२०२४ रोजी कि.दि.अर्ज. नं ७२/२०२४ चा अर्ज दाखल केलेला आहे. ज्याअर्थी अर्जदार उत्तम महारु भामरे यांचे शासकीय व निमशासकीय कामकाजासाठी त्यास अर्जदारांव्यतिरिक्त कोणीही वारस नाही. तरी अर्जदार यांनी धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधीश क. स्तर सो. यांच्या न्यायालयात अर्जदार हिचे नावाने वारस दाखला मिळणेकामी अर्ज केलेला आहे.

त्याअर्थी मे. न्यायालयाने पुढील चौकशीचे कामकाज चालविणेकरता पुढील चौकशी दि.१२-०२-२४ ही निश्चित केली आहे. त्याअर्थी तमाम जनतेस, हितचितक, वारस, वगैरे संबंधीतांना कळविण्यात येते की, याबाबत काही वाद असल्यास धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधिश सो. क स्तर कोर्ट नं. ३ यांचे न्यायालयत उक्त निश्चित तारखेस या तत्पूर्वी उपस्थित राहून हरकत नोंदवावी त्याअर्थि मे. कोर्टाने दिलेल्या व निश्चित केलेल्या तारखे पर्यंत कोणाचीही काहीही हरकत आली नाही तर सदर अर्जाच काम काज पुर्ण करण्यात येईल. त्यानंतर येणा-या तक्रारीची कोणतीही दखल घेतली जाणार नाही

ठिकाण :- धुळे
दिनांक :- ११/१/२०२४ आदेशावरुन

शिक्का

कामगिरी कारकुन — मे. दिवाणी न्यायालय सो. कोर्ट नं.
अधिक्षक — मे. दिवाणी न्यायालय सो. कोर्ट नं.

ॲड. प्रमोद एम. चौधरी
निशाणी क्र.-६

## जाहीर नोटीस

**धुळे येथिल मे दिवाणी न्यायाधीश (व.स्तर) सो. यांचे कोर्टात**

दि.कि. अर्ज नं. ७४/२०२४

आशा शरद माळी .....अर्जदार
वि
कोणीही नाही
(कै. शरद दत्तात्रय माळी -मयत) ...जाबदेणार

ज्याअर्थी अर्जदार यांनी धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधीश (व. स्तर) सो. यांचे न्यायालयात दि. ८/१/२०२४ रोजी दि. कि.अर्ज नं. ७४/२०२४ चा अर्ज दाखल केलेला आहे. ज्याअर्थी अर्जदार यांनी कै. शरद दत्तात्रय माळी यांचा वारस दाखला मिळणेकरीता अर्ज केलेला आहे.

त्याअर्थी मे. न्यायालयाने पुढील चौकशीचे कामकाज चालविणेकरीता पुढील चौ. दि. ६/२/२०२४ ही निश्चित केली आहे. त्याअर्थी तमाम जनतेस, हितचिंतक, वगैरे संबंधीतांना कळविण्यात येते की, याबाबत काही वाद असल्यास धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधीश सो. क. स्तर कोर्ट नं. ५. यांचे न्यायालयात उक्त निश्चित केलेल्या तारखेपर्यंत कोणाचीही काहीही हरकत आली नाही तर सदर अर्जाचे कामकाज पुर्ण करण्यात येईल त्यानंतर येणाऱ्या तक्रारीची कोणतीही दखल घेतली जाणार नाही.

ठिकाण- धुळे
दिनांक :-११/१/२०२४ आदेशावरुन

शिक्का

कामगिरी कारकुन — मे. दिवाणी न्यायालय सो. कोर्ट नं.
अधिक्षक — मे. दिवाणी न्यायालय सो. कोर्ट नं.

ॲड. एम. व्ही. घरटे
निशाणी क्र.-६

## जाहीर नोटीस

**धुळे येथिल मे. ५ वे सह दिवाणी न्यायाधिश सो., (क,स्त.) यांचे कोर्टात**

दि.कि. अर्ज नं. ५६/२०२४

श्रीमती विमलबाई लोटन न्हावी (पवार), उ.व.-६६, धंदा-घरकाम, २. श्री. उज्वलकुमार लोटनराव पवार, उ.व.-४७, धंदा-नोकरी, ३. श्री. पंकजकुमार लोटनराव पवार, उ.व. ४५, धंदा नोकरी,४. श्री. अतुलकुमार लोटनराव पवार, उ.व.-४३, धंदा-नोकरी, ५. श्रीमती सुषमा लोटनराव पवार, उ.व.-४१, धंदा-नोकरी, ६. श्रीमती आशा लोटनराव पवार, उ.व.-२९, धंदा-घरकाम, क्रं. १, ३, ५ व ६ रा. ९ अ संतसेना नगर, देवपुर, धुळे. क्रं. २ व ४ रा. १०७, सुरज केसरी नगर, कोरीट रोड, नंदुरबार. ....अर्जदार
विरुध्द
कै. लोटनराव संपत पवार (न्हावी)
मयताचा पत्ता- ९ अ, संतसेना नगर, देवपुर, धुळे.
मृत्यु दिनांक : ०९/०९/२०२० .....सा. वाला

**जाहीर नोटीस**

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

१. अर्जदार यांनी ते मयत कै. लोटनराव संपत पवार (न्हावी) यांचे कायदेशीर वारस आहेत असे ठरवून मिळण्यासाठी प्रस्तुतचा अर्ज मे न्यायालयात दाखल केलेला आहे.

२. सदर अर्जाकामी कोणाचीही काही एक हरकत असल्यास त्यांनी दिनांक : १४.०२.२०२४ रोजी सकाळी १०.३० वाजता आपण स्वतः अथवा आपल्या वकीलांमार्फेत हजर राहुन लेखी हरकत नोंदवावी.

३. उक्त दिवशी व वेळी कोणी हजर न झाल्यास कोणाचीही काहीही हरकत नाही असे समजुन पुढील आदेश पारीत करण्यात येईल. त्यानंतर कोणाचीही काही एक तक्रार ऐकुन घेतली जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

सदरची जाहीर नोटीस न्यायालयाचे शिक्यानिशी व माझे सहीनिशी
आज दि. ११.१.२०२४ रोजी प्रसिध्दीस दिली असे.

धुळे
दिनांक १९९.१.२०२४ आदेशावरुन

शिक्का

कामगिरी कारकुन — दिवाणी न्यायालय (व.स्त) धुळे
अधिक्षक — दिवाणी न्यायालय (व.स्त) धुळे

